


दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३२५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०६ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# मुंबईत पावसाचा हाहाकार!

## सर्व शाळा आणि कॉलेजेस बंद; हवामान विभागाचा 'ऑरेंज अलर्ट'

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, मुंबई :** मुंबई महानगर आणि उपनगरांमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा जोर अधिक वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर पालिका प्रशासनाने सोमवारी मुंबईतील शिक्षण संस्था बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.



**आज मुंबईतील सर्व शाळा महाविद्यालयांना सुटी जाहीर**

गेल्या काही दिवसांपासून कोकण किनारपट्टीसह मुंबई आणि परिसरात पावसाचा जोर प्रचंड वाढला आहे. पालघर, मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत पावसाची संततधार सुरू आहे. हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, उद्या म्हणजेच सोमवार, ६ जुलै २०२६ रोजी मुंबईत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन बृहन्मुंबई महानगरपालिकेनमुंबईतील सर्व शासकीय, खासगी, पालिका शाळा आणि महाविद्यालयांना सोमवारी सुटी जाहीर केली आहे.

**हवामान विभागाचा 'ऑरेंज अलर्ट'**

भारतीय हवामान विभागाने मुंबई महानगरासाठी सोमवारी मुसळधार पावसाचा म्हणजेच 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. या काळात मुंबईत मुसळधार पावसासोबतच ताशी तीव्र वेगाने सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे. पावसामुळे विद्यार्थ्यांची कोंडी होऊ नये आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी महानगरपालिका प्रशासनाने तातडीने हा सुटीचा निर्णय घेतला.

**कार्यालयीन कामकाज नियमित सुरू राहणार...**

शाळा आणि महाविद्यालयांना सुटी जाहीर करण्यात आली असली, तरी मुंबईतील सर्व शासकीय आणि खासगी कार्यालये मात्र नेहमीप्रमाणे नियमितपणे सुरू राहतील, असे पालिकेने स्पष्ट केले आहे.

**नागरिकांना सतर्कतेचे आवाहन**

मुंबईत पावसाचा जोर वाढल्याने बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. अत्यंत आवश्यक काम असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे, असे पालिकेच्या जनसंपर्क विभागाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे (जसंवि/२६२) कळवले आहे.

**कोकणात मुसळधार!**

कोकणात पावसाने रौद्र रूप धारण केले असून शनिवारी, ४ जुलै २०२६ रोजीच खबरदारीचा उपाय म्हणून ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये तसेच अंगणवाड्यांना सुटी देण्यात आली होती. आता पावसाचा हाच जोर कायम असल्याने मुंबईतील शिक्षण संस्थाही उद्या बंद राहणार आहेत.

## ठाण्यात आज शाळांना सुट्टी !

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०६, दिवा (ठाणे) :** अतिमुसळधार पावसाच्या इशाऱ्यामुळे ठाणे जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी, प्राथमिक व माध्यमिक शाळांना आज सोमवार ०६ जुलै २०२६ रोजी सुट्टी जाहीर.




IMD ने ठाण्यासाठी ऑरेंज अलर्ट दिला असून मुसळधार ते अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता आहे. सखल भागात पाणी साचण्याची व पूरस्थितीची शक्यता लक्षात घेऊन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी हा निर्णय घेतला आहे.

पालकांनी मुलांना घरीच ठेवावे व प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## उंब्रजमध्ये घरफोडी ! दीड लाखांची रोकड लंपास

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, उंब्रज :** उंब्रज,ता.कराड गावातील ग्रामपंचायतीच्या मागील बाजूस असलेल्या एका बंद घरावर अज्ञात चोरट्याने डल्ला मारत घरातील गोदरेज कपाटातील दुकान व्यवसायासाठी ठेवलेली तब्बल दीड लाख रुपयांची रोकड लंपास केली.




या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.उंब्रज पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या फिर्यादीनुसार, सुनिल विष्णु मोहिरे (वय ५७,व्यवसाय – व्यापार, रा. ग्रामपंचायतीच्या मागे, उंब्रज) यांनी याबाबत तक्रार दिली आहे. दि.०२ जुलै रोजी दुपारी २ वाजल्यापासून दि.०३ जुलै रोजी मध्यरात्री १२.१५ वाजेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात चोरट्याने घराच्या पाठीमागील दरवाजाचा कोंयडा उचकटून घरात प्रवेश केला.

त्यानंतर घरातील गोदरेज कपाट उचकटून तिजोरीत ठेवलेली रु.१ लाख ५० हजारांची रोख रक्कम चोरून नेली.या प्रकरणी उंब्रज पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २८१/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०५ व ३३१(३) अंतर्गत अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनेचा पुढील तपास सहाय्यक फौजदार रसाळ करीत आहेत.

## खरोशीत महापुराचा तडाखा; दरडी व झाडे कोसळून अनेक घरांचे नुकसान

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, पेण :** पेण तालुक्यात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून खरोशी परिसराला महापुराचा मोठा फटका बसला आहे. खरोशी-दुरशेत येथील बालगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने अनेक घरांमध्ये पुराचे पाणी शिरले, तर दरडी कोसळणे व झाडे पडण्याच्या घटनांमुळे अनेक घरांचे नुकसान झाले आहे. मागील वर्षाप्रमाणेच यंदाही महापुराने नागरिकांना मोठ्या संकटाला सामोरे जावे लागले असून गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



मुसळधार पावसामुळे हरिश्चंद्र तुकाराम पाटील यांच्या घरावर दरड कोसळून घराची भिंत फुटली. तसेच समाधान शंकर पाटील, रविता रवींद्र पाटील आणि संतोष मंगा पाटील यांच्या घरांवर आंब्याच झाड कोसळून नुकसान झाले. बागवाडी परिसरात प्रवीण नथुराम घरत, श्रीधर नथुराम घरत, किरण आत्माराम घरत, निलेश आत्माराम घरत आणि रघुनाथ घरत यांच्या घरांवर दरड कोसळल्याने मालमत्तेचे नुकसान झाले आहे.

याशिवाय केळंबा देवी मंदिराच्या पायऱ्यांवर मोठा दगड कोसळल्याने तेथील पायऱ्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

### बालगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला...

दरम्यान, बालगंगा नदीला आलेल्या पुरामुळे जावळी, निफाड, करोटी, निधवली, पाडळे तसेच परिसरातील आदिवासी वाड्या आणि गावांचा पेण तालुक्याशी संपर्क काही काळ पूर्णपणे तुटला होता. नदीचे पाणी रस्त्यावर आल्याने वाहतूक बंद झाली होती. त्यामुळे नोकरदार, आणि नागरिकांना घराबाहेर पडता आले नाही. सध्याकाळ नंतर पाण्याचा जोर काहीसा ओसरल्यानंतर परिस्थितीत सुधारणा झाली.

पुराच्या पाण्याने अनेक शेतांमध्ये प्रवेश केल्याने भात रोपवाटिका पाण्याखाली गेल्या असून त्या कुजण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. यामुळे खरीप हंगामावरही संकटाचे सावट निर्माण झाले आहे.

गावातील ज्या घरांमध्ये पुराचे पाणी शिरले होते, त्या घरांतील आबालवृद्धांना तातडीने सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. सरपंच रूपाली महेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य आणि गावातील ज्येष्ठ नागरिक प्रशासनाच्या सूचनांनुसार परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून मदतकार्य करत आहेत.

खरोशीतील सर्व नुकसानग्रस्त घरांचे तसेच महापुरामुळे बाधित झालेल्या कुटुंबांचे तात्काळ पंचनामे करून शासनाने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी सरपंच रूपाली महेश पाटील यांनी केली आहे.

## राहुरी खुर्द येथील स्वस्त धान्य दुकान फोडून १२ क्विंटल धान्याची चोरी

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०५, राहुरी :** राहुरी खुर्द येथील हनुमान मंदिर परिसरातील काळुबाई महिला बचत गट संचलित स्वस्त धान्य दुकान अज्ञात चोरट्यांनी फोडून सुमारे १२ क्विंटल गहू, तांदूळ तसेच एक टेबल फॅन असा ऐवज चोरून नेल्याची धक्कादायक घटना रविवारी पहाटे उघडकीस आली.




या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी मध्यरात्रीनंतर अज्ञात चोरट्यांनी स्वस्त धान्य दुकानाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. दुकानातील सुमारे १२ क्विंटल गहू व तांदूळ तसेच एक टेबल फॅन चोरून नेण्यात आला. रविवारी पहाटे दुकान चालक सोमनाथ पागिरे यांच्या आई सकाळच्या फेरफटक्यासाठी बाहेर पडल्या असता, स्वस्त धान्य दुकानाचे कुलूप तुटलेले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ ही माहिती सोमनाथ पागिरे यांना दिली. त्यानंतर सोमनाथ पागिरे यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली असता दुकानात चोरी झाल्याचे स्पष्ट झाले.

घटनेची माहिती मिळताच पुरवठा अधिकारी सुदाम केदार, महसूल अधिकारी तुषार काळे तसेच राहुरी पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून तपासाची सूत्रे हाती घेतली. चोरी करणाऱ्या अज्ञात आरोपींचा लवकरच शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन पोलिसांनी दिले.

स्वस्त धान्य दुकानातून मोठ्या प्रमाणात धान्य चोरीला गेल्यामुळे शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांच्या धान्य वितरणावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या घटनेचा सखोल तपास करून आरोपींना तातडीने अटक करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## चांदवड-लासलगाव मार्गावर ३२ किलो गांजा जप्त; सिन्नरच्या तिघांना अटक

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०५, विंचूर (नाशिक) :** नाशिक ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) अंमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई केली आहे. चांदवड-लासलगाव मार्गावरील दिघवद शिवारात सापळा रचून पोलिसांनी तब्बल ३२ किलो गांजा जप्त केला. या प्रकरणी सिन्नर तालुक्यातील तिघा संशयितांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून कारसह एकूण १४ लाख ७४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




**कारच्या डिकीत सापडला मुद्देमाल**

नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक (मालेगाव) व अपर पोलीस अधीक्षक (नाशिक ग्रामीण) यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या जिल्ह्यात अवैध व्यवसाय आणि अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात विशेष मोहीम सुरू आहे. ४ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चांदवड परिसरात गस्त घालत असताना, चांदवडकडून लासलगावच्या दिशेने जाणाऱ्या एका पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट डिझायर कारमधून गांजाची तस्करी होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारे पथकाने दिघवद शिवारात तात्काळ सापळा रचून संशयास्पद कार अडविली. पंचांसमक्ष कारची झडती घेतली असता, कारच्या डिकीत ३२ किलो गांजा लपवून ठेवल्याचे आढळून आले.

**सिन्नरचे तिघे जाळ्यात !**

या धडक कारवाईत पोलिसांनी संदीप रामनाथ सानप (वय ३६), अनिल केशव बोडके (वय ३०) आणि यश संदीप मोरे (वय २४) (सर्व रा. सिन्नर, जि. नाशिक) यांना ताब्यात घेऊन अटक केली.

**गुन्हा दाखल, पुढील तपास सुरू**

याप्रकरणी चांदवड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २७६/२०२६ अन्वये एनडीपीएस (NDPS) कायदा कलम ८(क), २०(ब)(ii)(क) व २९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी संशयितांकडून:

**३२ किलो गांजा !**

स्विफ्ट डिझायर कार (क्र. MH-01-BT-8813)

**मोबाईल फोन आणि रोख रक्कम**

असा एकूण १४ लाख ७४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास चांदवड पोलीस ठाण्याचे अधिकारी करीत आहेत. अंमली पदार्थांची तस्करी व विक्री रोखण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीस दलाकडून भविष्यातही अशाच धडक कारवाया सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## नाशिक महाकुंभ स्वच्छतेमध्ये खारीचा वाटा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** इनरव्हील क्लब ऑफ नागपूर ऑरेंज सिटी डिस्ट्रिक्ट ३०३ यांनी नाशिक येथे होणाऱ्या महाकुंभ साठी दोन मोठ्या कचरा पेटी दिल्या. आरोग्याचा मार्ग स्वच्छतेकडूनच जातो. आणि म्हणूनच महाकुंभमध्ये स्वच्छतेची आवश्यकता आहे. त्यासाठीच ईनरव्हील क्लब ऑफ नागपूर ऑरेंज सिटी ने आपला खारीचा वाटा उचलला. हा ३०३ चा डिस्ट्रिक्ट प्रोजेक्ट आहे. यावेळी डिस्ट्रिक्ट चेअरमन मनीषा चौधरी, अध्यक्ष स्मिता बागडदेव, डिस्ट्रिक्ट आय.एस.ओ. स्वाती वानकर, पूर्वाध्यक्ष शारदा रोशनखेडे, आय.एस.ओ. वैशाली चिंचोळकर, ट्रेझरर सुप्रिया पाठक, क्लब एडिटर सीमा मेटांगळे तसेच सर्व पूर्व अध्यक्ष व सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते.






## भारतातही फुटबॉल संस्कृती रुजायला हवी!

फुटबॉल हा जगातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ मानला जातो. जगातील जवळपास प्रत्येक देशात हा खेळ खेळला जात असल्याने त्याला खेळांचा राजा असेही म्हटले जाते. या खेळाचा सर्वात मोठा आणि प्रतिष्ठेचा सोहळा म्हणजे फिफा विश्वचषक. फुटबॉलप्रेमींसाठी हा स्पर्धा महोत्सव म्हणजे अक्षरशः कुंभमेळाच. यंदाचा २०२६ चा विश्वचषक अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांनी संयुक्तपणे आयोजित केला असून प्रथमच ४८ संघांच्या सहभागामुळे स्पर्धेचे स्वरूप अधिक व्यापक आणि रोमांचक झाले आहे.

यापूर्वी विश्वचषकात ३२ संघ सहभागी होत असत. मात्र यंदापासून ४८ संघांचा समावेश करण्यात आला आहे. १२ गटांमध्ये विभागलेल्या या स्पर्धेत प्रत्येक गटातील अव्वल दोन संघांसह सर्वोत्तम आठ तिसऱ्या क्रमांकाच्या संघांनाही बाद फेरीत प्रवेश मिळत आहे. त्यामुळे अधिक देशांना जागतिक स्तरावर स्वतःचे कौशल्य दाखवण्याची संधी मिळाली आहे.

यंदाच्या विश्वचषकात अनेक धक्कादायक निकाल पाहायला मिळाले. बलाढ्य संघांना अनपेक्षित पराभव पत्करावा लागला, तर काही नवोदित संघांनी आपल्या खेळाने जगाला चकित केले. त्यापैकी सर्वाधिक चर्चेत राहिला तो आफ्रिकेतील छोटासा केप वर्दे देश. अवघी सुमारे सहा लाख लोकसंख्या असलेल्या या देशाने प्रथमच विश्वचषकासाठी पात्रता मिळवली आणि बाद फेरीपर्यंत मजल मारत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अर्जेंटिनाविरुद्ध अखेरच्या क्षणी गोल स्वीकारल्यामुळे त्यांचा प्रवास थांबला; पण त्यांनी फुटबॉलप्रेमींची मने जिंकली. आकाराने लहान असला तरी जिद्द, शिस्त आणि सांघिक खेळाच्या बळावर जगात स्वतःचे स्थान निर्माण करता येते, हे केप वर्देने सिद्ध करून दाखवले.

एका बाजूला केप वर्देसारखा छोटा देश जागतिक फुटबॉलमध्ये उल्लेखनीय कामगिरी करतो, तर दुसऱ्या बाजूला तब्बल १४५ कोटी लोकसंख्या असलेला भारत अजूनही विश्वचषकापासून दूर आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या देशाला जागतिक फुटबॉलमध्ये ठोस स्थान निर्माण करता आलेले नाही, ही निश्चितच चिंतेची बाब आहे. प्रतिभेची कमतरता नसतानाही नियोजन, पायाभूत सुविधा, प्रशिक्षण व्यवस्था आणि तळागाळातील विकास यामध्ये आपण मागे पडत आहोत.

भारतात क्रिकेटला मिळणारी लोकप्रियता आणि सुविधा इतर खेळांना मिळत नाहीत, हे वास्तव आहे. फुटबॉलची परंपरा पश्चिम बंगाल, केरळ, गोवा आणि ईशान्येकडील काही राज्यांपुरतीच मर्यादित राहिली आहे. अनेक ठिकाणी दर्जेदार मैदाने, प्रशिक्षक, प्रशिक्षण केंद्रे आणि स्पर्धांचा अभाव आहे. त्यामुळे अनेक गुणवान खेळाडूंना स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची संधीच मिळत नाही.

भारतात फुटबॉल संस्कृती रुजवायची असेल तर केवळ व्यावसायिक लीग पुरेशा ठरणार नाहीत. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर फुटबॉलला प्रोत्साहन देणे, प्रत्येक जिल्ह्यात दर्जेदार मैदाने उभारणे, प्रशिक्षित प्रशिक्षक उपलब्ध करून देणे, नियमित स्पर्धांचे आयोजन करणे आणि ग्रामीण भागातील प्रतिभेला योग्य व्यासपीठ मिळवून देणे आवश्यक आहे. माध्यमांनीही फुटबॉलला अधिक प्रसिद्धी दिल्यास आणि आंतरराष्ट्रीय सामन्यांचे व्यापक प्रक्षेपण झाल्यास तरुण पिढी या खेळाकडे अधिक आकर्षित होईल.

भारताकडे प्रतिभा, युवा शक्ती आणि संसाधनांची कमतरता नाही. गरज आहे ती दीर्घकालीन नियोजनाची, सातत्यपूर्ण गुंतवणुकीची आणि फुटबॉलला लोकचळवळीचे स्वरूप देण्याची. क्रिकेटप्रमाणेच फुटबॉललाही देशभरात पोषक वातावरण निर्माण झाले, तर भारताचाही तिरंगा एक दिवस फिफा विश्वचषकाच्या मैदानावर अभिमानाने फडकताना पाहण्याचे स्वप्न निश्चितच साकार होऊ शकते.

**- जगन घाणेकर**

# सण-उत्सवांत प्रयोग नको !

शिस्त आणि नियम जसे वैयक्तिक जीवनात असतात तसे ते सामाजिक आणि व्यावहारिक जीवनातही असतात. त्यांचेही पालन आपण करत असतो. जशी वाहने नेहमी डाव्या बाजूने चालवावीत, सिग्नल लागल्यावर वाहन थांबवावे, तिकीट काढताना, बँकेत पैसे भरताना आणि काढताना ज्या ज्या ठिकाणी रांग लावण्याचा नियम आहे त्या ठिकाणी आपण ती शिस्त आणि नियम पाळतो. प्रवास करताना आपण स्वतःहून तिकीट काढतो. पास, पीयूसी, इन्शुरन्स, परवाने यांची मुदत संपली असेल तर ते स्वतःहून रिन्यू करून घेतो. अर्थात हे सर्व नियम नाही पाळले तर काही ठिकाणी दंडाची व्यवस्था करण्यात आलेली असते.

याशिवाय इतरांची बोलणी खावी लागतात ती वेगळी. व्यवहारिक जीवनात वावरताना आपण प्रत्येक नियम आणि त्यामागील शिस्त यांचे तंतोतंत पालन करत असतो. घरचा टीव्ही बिघडला कि टीव्ही दुरुस्त करणाऱ्याकडे जातो, आजारी पडल्यावर डॉक्टरकडे जातो, कोणाविरुद्ध तक्रार दाखल करायची असल्यास पोलिसांकडे जातो, न्याय मागण्यासाठी वकिलांची मदत घेतो, मुलांना शिकण्यासाठी शाळेत घालतो. घर बांधण्यासाठी गवंड्याला बोलावतो, फर्निचरचे काम असेल तर सुताराला बोलावतो, साधी चप्पल फाटली असेल तरी आपण ती स्वतः शिवत नाही. थोडक्यात व्यावहारिक जीवनात ज्या ठिकाणी आपल्याला अडचण किंवा समस्या उद्भवते त्या त्या वेळी आपण त्या क्षेत्रातील तज्ज्ञाकडे जातो आणि ती समस्या सोडवतो. मी कायद्यांचा अभ्यास केला आहे म्हणून माझी केस मी लढू शकत नाही, शस्त्रक्रियेवरील पुस्तके वाचली म्हणून मी कोणाची शस्त्रक्रिया करू शकत नाही या गोष्टी कोणाला सांगाव्या लागत नाहीत कारण त्या प्रत्येकालाच कळतात. ज्या ठिकाणी अध्यात्म अथवा धर्मशास्त्र येते त्या ठिकाणी मात्र आम्ही हिंदू मंडळी मलाच जास्त कळते, मी म्हणेल तेच खरे म्हणू लागतो.

हल्लीच वटपौर्णिमा सण सर्वत्र उत्साहात साजरा झाला. सौभाग्याच्या रक्षणासाठी आणि दीर्घायुष्यासाठी स्त्रिया व्रतस्थ राहून हा सण साजरा करतात. वडाचे पूजन करून पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करतात. या व्रतामागिल सत्यवान सावित्रीची कथा सर्वांनाच ठाऊक आहे. मात्र इथेही हिंदूनी आपली बुद्धी चालवलीच. कुडाळमध्ये पत्नीच्या दीर्घायुष्यासाठी पुरुषांनी उपवास करून वटवृक्षाला फेऱ्या मारल्या. मागील १७ वर्षांपासून ही प्रथा याठिकाणी सुरु आहे. व्रजमंडळात सवंगड्यांच्या मदतीने थरावर थर रचत श्रीकृष्णाने गोपिकांच्या शिंकेतील दही चोरून खाल्ले म्हणून दहीहंडी साजरी केली जाते. गेल्या काही वर्षांत राज्यात महिलांच्या दहीहंडीची प्रथा सुरु झाली आहे.

ज्यावर लाखोंची बक्षिसे लावली जात आहेत. गोपाळकाला उत्सवाचे तर पुरते बाजारीकरण झाले आहे. गणेश चतुर्थीच्या दिवशी शाडू मातीची मूर्ती घरी आणावी असे धर्मशास्त्रात सांगितले असताना आज ठिकठिकाणी कागदाच्या लगद्याचा, चॉकलेट. सुका मेवा, बिस्किटे, नारळ, भांडी यांपासून बनवलेल्या मुर्त्या बसवलेल्या सर्रास पाहायला मिळतात. नवरात्रीच्या नऊ दिवसांत विविध नऊ रंगाच्या साड्या परिधान करण्याचे आवाहन केले जाते ज्याला कोणताही शास्त्रीय आधार नाही. दीपावली हा खरेतर दिव्यांचा अर्थात प्रकाशाचा उत्सव मात्र आजमितीला दीपावली म्हणजे कानठळ्या बसवणाऱ्या, प्रदूषणकारी फटाक्यांचा उत्सव असे समीकरण बनले आहे. होळीच्या दिवसांत तथाकथित पुरोगामी मंडळींकडून कचऱ्याची होळी करण्याचे आवाहन केले जाते आणि भोळेभाबडे हिंदू तशी कृतीही करतात. महाशिवरात्रीला दूध शिवपिंडीवर न चढवता गरिबांना वाटण्याचे संदेश काही नास्तिक मंडळींकडून पसरवले जातात, बुद्धिभ्रम करणाऱ्या या संदेशांना दरवर्षी अनेक जण बळी पडतात. आधुनिकतेच्या नावाखाली हिंदूंच्या प्रत्येक सण उत्सवांत आज काहीनाकाही शास्त्रविसंगत प्रयोग केले जात आहेत. धर्मशास्त्र विसंगत असे काही विचित्र प्रयग केले तर लगेचच प्रसिद्धी मिळते, त्याचे व्हिडओज सोशल मीडियावर व्हायरल होतात, लोकांकडून ते फॉरवर्ड केले जातात. नास्तिक आणि पुरोगामी मंडळी त्यांचे कौतुक करतात, त्यांना क्रांतिकारकांची उपमा देतात; मात्र असले प्रयोग करून कोणताही अध्यात्मिक लाभ न होता हानी मात्र होते हे या महाभागांना कोण समजावणार ? मुस्लिमांनी बकरी ईदच्या दिवशी मातीची प्रतीकात्मक बकरी करून तिची कुर्बानी दिल्याचे कधी ऐकले आहे का ? ख्रिसमस ट्रीमुळे प्रदूषण होते हे ज्ञात असूनही कोण्या ख्रिस्ती व्यक्तीने ख्रिसमसला ख्रिसमस ट्री आणू नका असे आवाहन केले आहे का ? मग हिंदूच आपली बुद्धी का चालवतात ? प्रत्येक सणामागील शास्त्र काय आहे आणि तो कसा साजरा करावा याबाबतचा सखोल अभ्यास आणि लेखन अध्यात्मातील अधिकारी वर्गाने म्हणजेच आपल्या ऋषी मुनींनी हजारो वर्षांपूर्वी केले आहे.

त्यामुळे ते तसे साजरे केल्यानेच आपणाला लाभ होणार आहे. आरंभी उल्लेख केल्याप्रमाणे व्यवहारिक जीवनात आपण त्या त्या क्षेत्रातील अधिकारी व्यक्तींचा सल्ला घेतो मग धार्मिक बाबतीत बुद्धीचा वापर का करतो? आपल्या अशा प्रयोगाने येणाऱ्या पिढीमध्ये संभ्रम निर्माण होऊन अध्यात्माविषयी आणि आपल्या धर्मशास्त्राविषयी त्यांचा विश्वास डळमळीत होणार नाही का? पाश्च्यात्य देशांमध्ये विज्ञानाने दिलेली सुखाची साधने मुबलक प्रमाणात असली तरी सर्वत्र अनैतिकता बोकाळली आहे, कुटुंबव्यवस्था नष्ट होऊ लागली आहे, मानव निराशेत आणि ताणामध्ये जगत आहे. अशा परिस्थितीत स्वतःचा आणि समाजाचा उद्धार करण्यास शिकवणारी प्राचीन भारतीय संस्कृती, ग्रंथसंपदा आपल्याला आपल्या पुण्याईने लाभली आहे, तिचा लाभ घेऊया. नको तिथे बुद्धीचा वापर करणे टाळूया !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# हल्ली गाड्या शिस्तीत चालवणे काळाची गरज!

साधारण पाच-दहा वर्षांपूर्वी रोडवर वाहनांची संख्या आणि गाड्यांची वर्दळ खूपच कमी प्रमाणात होती. लोकांकडे आजच्या एवढी लहान-मोठी वाहने नव्हती. फार क्वचित लोकांकडे गाड्या पहावयास मिळायच्या. बहुतांश लोक गावखेड्याला किंवा शहरी भागात जायचे झाल्यास सर्रासपणे महामंडळ बसचा म्हणजेच लालपरीचा वापर करायचे. तेव्हा फार कमी लोकांकडे दुचाकी व चारचाकी गाड्या असायच्या. आणि ज्यांच्याकडे गाड्या आहेत, त्या माणसांना खूप मोठा व श्रीमंत व्यक्ती समजले जायचे.

एकेकाळी दुचाकी व चारचाकी वाहने खूप कमी होती. लोक एसटीने किंवा प्रवासी गाड्यांनी भ्रमंती करायचे. तेव्हा रोडवर देखील वाहनांची रहदारी आणि वर्दळ खूपच कमी असायची. आणि ड्रायव्हर सुद्धा निर्व्यसनी, प्रशिक्षित व शिस्तप्रिय असायचे. मद्य प्राशन करून सुसाट वेगाने ते गाड्या कधीच चालवत नव्हते. गाडी नियमांचे व रोड नियमांचे पालन करूनच ते गाड्या शिस्तीने व सावकाशपणे चालवायचे. कोणताच ड्रायव्हर शिस्त सोडून मस्तवालपणे गाडी चालवताना दिसायचा नाही. दोन्ही डोळ्यात पूर्ण तेल ओतून आणि मनात थोडी भीती बाळगून ड्रायव्हर उत्कृष्टपणे व सफाईदारपणे गाडी चालवायचे. त्याकाळी गाडी अपघातांचे प्रमाण देखील खूप कमी होते. कारण तेव्हाचे ड्रायव्हर शिस्तप्रिय, प्रशिक्षित आणि निर्व्यसनी होते. आपल्या हातून कोणतीच जीवित हानी होणार नाही याची दक्षता घ्यायचे.

परंतु हल्ली ड्रायव्हर लोकांनी स्वतःच्या हातानेच स्वतःची प्रतिमा मलीन करून टाकली आहे. म्हणूनच तर ड्रायव्हर बंधूंकडे बघण्याचा लोकांचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलून गेला आहे.

ड्रायव्हर म्हणजे शैक्षणिक प्रवाहाच्या बाहेर फेकला गेलेला आणि व्यसनाच्या विखारी विळख्यात अडकलेला व्यसनाधीन माणूस म्हणजे आताचा चालक किंवा ड्रायव्हर होय. अशी लोकांची मानसिकता बनली आहे. मद्यपान केल्याशिवाय गाड्या न चालवणारे ड्रायव्हर हल्ली अगदी बोटावर मोजण्याइतकेच शिल्लक आहेत. म्हणूनच की काय? आता गाडी अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. आतापर्यंत गाडी अपघातात एकूण मृत्यू पावणाऱ्यांपैकी व्यसनाधीन तरुणांचे प्रमाण त्यात अधिक आहे. आता घरोघरी गाड्या झाल्या आहेत, आणि ज्या घरात एकही गाडी नाही आणि एकही ड्रायव्हर नाही असे घर माझ्या मते शोधूनही सापडणार नाही. अगदी दहा-बारा वर्षे वयोगटातील लहान मुले सुद्धा मस्तवालपणे दुचाकी व चारचाकी वाहने भरधाव वेगाने चालवत आहेत. कोणताच मागचा पुढचा विचार न करता बेदरकारपणे आणि सुसाट वेगाने गाड्या पळवत आहेत. गाड्या शिस्तीत चालवायच्या सोडून मस्तीत चालवत आहेत. दारू ढोसून गाड्या चालवणे



आताच्या ड्रायव्हरची जणू फॅशनच बनली आहे. म्हणून बहुतांश ड्रायव्हर दारू प्राशन करूनच गाडीची चाके फिरवतात. देशात सर्वाधिक मृत्यू हे गाडी अपघाताने होतात, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. यात व्यसनाधीन, मस्तवाल, अज्ञानी, विदाऊट लायसन्स आणि अविवेकी ड्रायव्हरमुळे निर्व्यसनी, निष्पाप व निरागस लोकांना नाहक अपघाताला सामोरे जाऊन मृत्युमुखी पडावे लागत आहे. ज्यांना गाडीवर कंट्रोल नाही, ज्यांना गाडीची परिपूर्ण माहिती नाही, असे ड्रायव्हर सुद्धा स्वतःच्या आणि दुसऱ्यांच्या जीवाची जराही पर्वा न करता बेफिकिर व मस्तवालपणे वायू वेगात गाड्या चालवत आहेत. सध्या जगाच्या पाठीवर वाहनांची संख्या अमाप झाली आहे. जिकडे बघावे तिकडे नुसत्या गाड्याचगाड्या दिसताहेत. रस्ते सुद्धा खाचखळग्यांचे व अरुंद असल्यामुळे आणि रस्त्यावर गाड्यांची वाहतूक प्रचंड असल्यामुळे ड्रायव्हर बंधूंनी वाहने सावकाश, नियमबद्ध व शिस्तबद्ध चालवणे काळाची गरज बनली आहे. परंतु ड्रायव्हर मद्यपान करून, बेशिस्त, बेफिकिर, स्वतःचा गाडीवर ताबा नसल्यामुळे आणि गाडीचा वेग सुसाट असल्यामुळे गाड्यांचा अपघात होऊन जीवित हानी होणे ही नटळणारी बाब आहे. आताची युवा पिढी वाहनांना जरा हलक्यात घेत आहे. वाहने म्हणजे त्यांना लहान मुलांचे खेळणे वाटत आहे. म्हणून त्यांना गाड्या चालवण्याची जराही भीती वाटत नाही. म्हणून ते मद्यधुंद अवस्थेत कसेही मनमानी व मस्तवालपणे वाहने चालवून स्वतःच्या व दुसऱ्यांच्या जीवाला हानी पोहोचवत आहेत. प्रशासनाने प्रशिक्षित, परवानाधारक, निर्व्यसनी आणि प्रौढ चालकांनाच रोडवर गाड्या चालवण्याची मुभा द्यावी. आणि जे ड्रायव्हर रोड नियमांचे काटेकोरपणे पालन करत नाहीत आणि मद्यधुंद अवस्थेत गाड्या चालवतात अशा चालकांना योग्य तो दंड ठोठावून प्रसंगी त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी. तरच रोड अपघातात मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण कमी होईल. अशा व्यसनी व नालायक ड्रायव्हरमुळे चांगल्या व प्रशिक्षित चालकांना वाहने चालवण्यास खूप भीती वाटत आहे. हल्ली रोडच्या कडेने पायी चालत जाणे सुद्धा चांगल्या लोकांसाठी धोकादायक बाब बनली आहे. कोण, कुठून व कसा येईल? आणि आपल्याला कधी वर घेऊन जाईल? हे कोणालाच सांगता येत नाही. म्हणून प्रत्येकाने गाड्या चालवताना अतिशय शिस्तीने, सावकाश आणि रोड नियमांचे पालन करूनच दक्षतेने व काळजीपूर्वक वाहने चालवावीत. विशेष बाब म्हणजे चालकांनी केवळ गाड्या चालवताना तरी दारू प्राशन करू नये. आणि जनतेला सुद्धा माझी नम्र विनंती आहे की, रस्त्याने पायी चालताना, गाडी चालवताना किंवा रस्ता क्रॉस करताना अतिशय शिस्तीने आणि दक्षतेने वाटचाल करावी. शिस्तीला आणि नियमांना पायदळी तुडवून मस्तवालपणे व बेदरकारपणे गाड्या चालवत असाल तर ड्रायव्हर बंधूंनो, वेळीच सावधान..!

पुढे धोका आहे, वाहने सावकाश चालवा.

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## चाणाक्य

चाणाक्य निती सांगे
होऊ नकात लाचार
सत्ताकशी टिकवावी
करावा उचीत विचार

जमे भोवताली भाट
करी मोकळा संचार
भरकटे धुक्यात वाट
चित्र भ्रामक साचार

परखड बोलती असे
हवे शेजार दोन चार
चुकतो कुठे सांगती
शब्दांस सत्याचीधार

अंध विश्वास नसावा
ऐकता कानसमाचार
अनिष्ट काही घडता
वेळीचं घ्या समाचार

आतले आवाज ऐकू
स्पष्ट करावे उच्चार
दृष्टी पलीकडले खरे
ना गुळू मूळु लाचार

प्रसिद्धी चिरंतन देई
करा सदा सदाचार
बातमी होऊन फिरे
झाका जरी दुराचार

**हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक बातमी

# फ्यूज कॉल सेंटरची वेळ वाढविण्यासाठी उपनगराध्यक्ष पठाण व नगरसेवक शेख अथर यांचे निवेदन

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०४, जिंतूर :** शहरातील नागरिकांना वीजपुरवठ्याशी संबंधित समस्या अधिक वेगाने आणि प्रभावीपणे सोडविण्यासाठी जिंतूर नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष मोहसीन पठाण आणि नगरसेवक शेख अथर यांनी आज सेलू येथे जाऊन उपविभागीय अभियंता श्री. काळे यांची भेट घेत महत्त्वपूर्ण निवेदन सादर केले.

सध्या शहरातील नागरिकांना वीज खंडित झाल्यानंतर फ्यूज कॉल सेंटरच्या मर्यादित वेळेमुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित झाल्यास तातडीने दुरुस्ती होत नसल्याने नागरिकांची गैरसोय वाढते. ही बाब लक्षात घेऊन फ्यूज कॉल सेंटरची सेवा सकाळी



८.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत सुरू ठेवावी, आवश्यक तेवढे कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत आणि तक्रारींवर त्वरित कार्यवाही करण्यासाठी यंत्रणा सक्षम करावी, अशी ठाम मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी उपनगराध्यक्ष मोहसीन पठाण आणि नगरसेवक शेख अथर यांनी सांगितले की, जिंतूरकरांना वीजसंबंधी किरकोळ कारणांसाठी तासन्तास प्रतीक्षा करावी लागू नये. नागरिकांना वेळेत आणि दर्जेदार सेवा मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. त्यामुळे वीज विभागाने जनहिताच्या दृष्टीने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा.उपविभागीय अभियंता श्री. काळे यांनी निवेदन स्वीकारून संबंधित मागण्यांबाबत सकारात्मक विचार करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

जिंतूरकरांच्या हितासाठी आणि शहरातील मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी आमचे प्रयत्न यापुढेही सातत्याने सुरू राहतील, असा विश्वास उपनगराध्यक्ष मोहसीन पठाण आणि नगरसेवक शेख अथर यांनी व्यक्त केला. ही बातमी आणखी ठळक मथळ्यासह किंवा वृत्तपत्राच्या फ्रंट पेज शैलीतही तयार करून देऊ शकतो.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# चंद्रपूर हाफ मॅरेथॉनला महाराष्ट्रातून उत्स्फूर्त प्रतिसाद

## सचिन यादव विजेता, बाळूभाऊ धानोरकरांना अनोखी मानवंदना

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** चंद्रपूरमध्ये आयोजित राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉनला महाराष्ट्रातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दिवंगत खासदार बाळूभाऊ धानोरकप यांच्या स्मरणार्थ आयोजित स्पर्धेत मुंबईच्या सचिन यादवने विजेतेपद पटकाविले. हजारे क्रीडाप्रेमी, धावपटू आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हा ऐतिहासिक क्रीडा सोहळा उत्साहात पार पडला.

मराठा चॅरिटेबल ट्रस्ट, चंद्रपूरच्या वतीने आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली एक ऐतिहासिक क्रीडा सोहळा चंद्रपूरच्या भूमीत संपन्न झाला. दिवंगत खासदार बाळूभाऊ धानोरकर यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यासाठी ' रन फॅर इन्स्पिरेशन, रम फॅर बाळूभाऊ' या संकल्पनेवर आधारित भव्य राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

स्व. बाळासाहेब ठाकरे प्रवेशद्वार भद्रावती ते पडोली चौक, चंद्रपूर या मार्गावर पार पडलेल्या या ऐतिहासिक धावण्याच्या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातील खेळाडूंनी आणि क्रीडाप्रेमांनी अभूतपूर्व गर्दी करत मोठा उत्साह दाखविला; तर विशेष आकर्षण म्हणून छोटूलाल सोम लकर यांनी आपल्या वाहनावर तिरंगा लावून या संपूर्ण मॅरेथॉन रॅलीचे अत्यंत दिमाखात नेतृत्व केले.



या चुरशीच्या स्पर्धेत राज्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या धावपटूंनी आपला कस लावला, ज्यामध्ये खुल्या गटात मुंबईच्या सचिन यादव याने अव्वल स्थान पटकावत १,००,००० रुपयांचे प्रथम क्रमांकाचे रोख पारितोषिक आणि मानाचा किताब आपल्या नावे प्राप्त केला. याच गटात नागपूरच्या राजन यादव याने द्वितीय क्रमांक मिळवून ५१,००० रुपये आणि नागराज खुडसंगे याने तृतीय क्रमांक पटकावून ३१,००० रुपयाचे रोख पारितोषिक मिळविले.

महिला स्पर्धकांसाठी ठेवण्यात आलेल्या विशेष बक्षिसांमध्ये चंद्रपूरची साक्षी पोलीजवार हीने प्रथम (१५,००० रुपये), अभिलाषा भगत हिने द्वितीय (१०,००० रुपये), आणि श्धदा थोरात हिने तृतीय (५,००० रुपये) क्रमांक पटकावला. तसेच अचल रमेश कंदुकर हिला प्रोत्साहनपर पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. स्थानिक खेळाडूंना वाव देण्यासाठी चंद्रपूर लोकसभा क्षेत्रातील स्पर्धकांसाठी जाहीर केलेल्या विशेष पुरस्कारांमध्ये विवेक भगत याने प्रथम (२१,००० रुपये), रितीक धोडरे याने द्वितीय (११,००० रुपये), आणि यश सातपुते याने तृतीय (७,००० रुपये) क्रमांक मिळवून दिमाखदार कामगिरी केली.

या भव्य क्रीडा महोत्सव याप्रसंगी खा.प्रतिभा धानोरकर, भद्रावती काँग्रेस तालुका अध्यक्ष सुरज गावंडे, भद्रावती ग्रामीण कॅाग्रेस तालुका अध्यक्षप्रशांत काळे, चंद्रपूर ग्रामीण तालुका अध्यक्ष नरुले, प्रवीण काकडे, नगरसेवक राहुल चौधरी, प्रोफेशनल काँग्रेस जिल्हाध्यक्ष रामकृष्ण कोंड्रा, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश पानपट्टीवार, धनुभाऊ गुंडावार, नगरसेविका सरिता सूर, नगरसेवक सुनील नामोजवार, नगरसेविका रेखा खुटेमाटे, शोभा पारखी, उर्मिला साव, आशाताई जाधव, नगरसेवक अनिल पडोळे, नगरसेवक प्रथमेश गेडाम, कल्पना मत्ते, अर्चना सातपुते, रितेश वाढई, छोटू धकाते, नितीन सातपुते, म ेरेश्वर आवारी, गोपाल अमृतकर, सुयोग भोयर, अतुल वाघमारे, मनिष दास, आणि दिक्षा सातपुते, राहुल तायडे यांसह राजकीय, सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.उपस्थित सर्व मान्यवरांनी विजेत्या खेळाडूंचे कौतुक करत दिवंगत खासदार बाळूभाऊ धानोरकर यांच्या आठवणींना उजाळा दिला. हा उपक्रम जिल्ह्यातील व राज्यातील युवकांना क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी आणि आरोग्याविषयी जागरुक राहण्यासाठी मोठी प्रेरणा देणारा ठरेल, असा विश्वास खासदार प्रतिभा धानोरकर यांनी आपल्या संबोधनातून व्यक्त केला.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षित व सुलभ शिक्षण प्रवासासाठी एसटी महामंडळ कटिबद्ध - परिवहन मंत्री सरनाईक

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०५, मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची 'लालपरी' ही केवळ प्रवासी वाहतुकीचे साधन नसून राज्यातील लाखो शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची, सुरक्षिततेची आणि उज्वल भविष्याची विश्वासू जीवनवाहिनी बनली आहे. दुर्गम व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची संधी पोहोचविण्याचे सामाजिक दायित्व एसटी महामंडळ अनेक दशकांपासून प्रभावीपणे पार पाडत असल्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाला सर्वोच्च प्राधान्य देत शालेय वेळेत बसस्थानकांवर पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. हे कर्मचारी विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बसमध्ये चढण्यास मदत करतात. तसेच, प्रवासादरम्यान



कोणतीही अडचण उद्भवल्यास तातडीने मदत मिळावी यासाठी एसटी महामंडळाने स्वतंत्र टोल-फ्री मदत केंद्र सुरू केले असून त्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांचा एसटीवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

राज्यात दररोज सुमारे ३० हजार १७७ शालेय फेऱ्यांद्वारे लाखो विद्यार्थ्यांना सुरक्षित व नियमित प्रवासाची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आर्थिक अडथळा येऊ नये, यासाठी एसटी महामंडळ विविध सवलतींच्या योजना प्रभावीपणे राबवत आहे. अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतच्या मुलींना शंभर टक्के म ोफत प्रवासाची सुविधा देण्यात आली आहे. शैक्षणिक सहलींसाठी ५० टक्के सवलत, मासिक विद्यार्थी पासवर ६६.६७ टक्के सवलत तसेच उन्हाळी सुट्टी, परीक्षा, शैक्षणिक शिबिरे किंवा आजारी पालकांना भेट देण्यासाठीच्या प्रवासासाठीही ५० टक्के सवलत देण्यात येते.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये २५.१३ लाख अहिल्याबाई होळकर पास आणि २७.९८ लाख विद्यार्थी मासिक पास वितरित करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांसाठी एनसीएमसी (छउचउ) स्मार्ट कार्ड देण्याची प्रक्रियाही सुरू असून त्यामुळे त्यांचा प्रवास अधिक सुलभ, आधुनिक आणि पारदर्शक होणार आहे. कौशल्य सेतू अभियानांतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवासभाड्यात ६६.६७ टक्के सवलत दिली जात आहे. तसेच मानव विकास योजनेअंतर्गत राज्यातील २२ जिल्ह्यांमध्ये ९६६ बसेसद्वारे ७३ हजार ६२१ मुलींना मोफत वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

एसटीची 'लालपरी' ही आज केवळ रस्त्यावर धावणारी बस नसून प्रत्येक विद्यार्थ्याच्या स्वप्नांची सारथी, प्रत्येक पालकाच्या विश्वासाची हमी आणि महाराष्ट्राच्या उज्वल भविष्यासाठी अविरत धावणारी ज्ञानवाहिनी आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आयुष्यात शिक्षणाचा दीप अखंड तेवत ठेवण्यासाठी एसटी महामंडळ अधिक सक्षमपणे, संवेदनशीलतेने आणि समर्पित भावनेने कार्य करत राहील, असा विश्वास परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

# महाराष्ट्रात शासकीय आश्रमशाळा चिंधीचकचा मानाचा तुरा; राज्यस्तरीय गुणांकनात अव्वल स्थान

## विद्यार्थिनी, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नांना यश

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.०५, चिमूर (नागपूर) :** आदिवासी विकास विभागामार्फत राज्यातील शासकीय आश्रमशाळांमध्ये गुणवत्ता वाढीसाठी आयोजित करण्यात आलेल्या सत्र २०२५-२६ च्या गुणांकन स्पर्धेत नागपूर विभागांतर्गत येणाऱ्या शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, चिंधीचक (ता. नागभिड, जि. चंद्रपूर) या शाळेने ८१.२४ टक्के गुण मिळवत संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. महाराष्ट्र राज्यात आदिवासी विकास मंत्रालयामार्फत अमरावती, ठाणे, नाशिक आणि नागपूर असे चार आदिवासी विकास विभाग कार्यरत आहेत. या चारही विभागांमध्ये एकूण ५०४ शासकीय आश्रम शाळा असून आदिवासी विकास विभागाचे आयुक्तालय नाशिक येथे आहे.

महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी विकास आयुक्त श्रीमती लिना बन्सोड यांच्या संकल्पनेतून शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये राज्यस्तरीय गुणांकन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, शाळेतील सुविधा आणि विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी यांचा सर्वांगीण आढावा घेण्यासाठी ही स्पर्धा राबविण्यात आली.

या स्पर्धेत शाळांचे मूल्यमापन विविध निकषांच्या आधारे करण्यात आले. यामध्ये बाल हक्क संरक्षण प्रणाली, ई-निरीक्षण ॲपवरून प्राप्त निरीक्षणे, पायाभूत साक्षरता (भाषा) चाचणी, पायाभूत संख्याज्ञान (गणित) चाचणी तसेच पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञानाशी संबंधित विविध घटकांचा समावेश करण्यात आला होता. या सर्व बाबींचे मूल्यांकन तीन त्रयस्थ संस्थांमार्फत करण्यात आले.

'आम्ही आमच्या आरोग्यासाठी', 'बाल संरक्षण प्रणाली', 'माझी शाळा माझा स्वाभिमान' हे उपक्रम प्रथम एज्युकेशन फाउंडेशन, दिल्ली यांच्या माध्यमातून राबविण्यात आले, तर 'वोपा' संस्थेमार्फत पायाभूत साक्षरता अभियानांतर्गत भाषा आणि गणित विषयांवरील उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली.

या राज्यस्तरीय गुणांकनात नागपूर विभागातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमूर अंतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, चिंधीचकने हे सर्व उपक्रम यशस्वीरित्या राबवून ८१.२४ टक्के गुण मिळवत राज्यात अव्वल स्थान मिळवले. तर अमरावती विभागातील शासकीय आश्रमशाळा झटाळा हिने ७२.१२ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला असून नाशिक विभागातील शासकीय आश्रमशाळा देवम ेगरा ही ६६.९४ टक्के गुणांसह तृतीय स्थानी राहिली.




शासकीय माध्यमिक आश्रमशाळा चिंधीचकच्या या यशामागे विद्यार्थिनी, मुख्याध्यापक, शिक्षक, अधीक्षक, अधीक्षक तसेच चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे सामूहिक परिश्रम आणि समन्वय महत्त्वाचा ठरला आहे. तसेच प्रकल्प अधिकारी श्रीमती जागृती कुंमरे यांचे वेळोवेळी मिळालेले मार्गदर्शन आणि कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री. वाटाने यांचे सहकार्य ही मोलाचे ठरले.

दरम्यान, नागपूर विभागाच्या अपर आयुक्त आयुषी सिंह यांनी दिनांक २ जुलै २०२६ रोजी मुख्याध्यापकांचा गौरव करून अभिनंदन केले. शासकीय आश्रमशाळा चिंधीचकच्या या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थिनी व कर्मचाऱ्यांवर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# थोडक्यात

## मुसळधार पावसानंतर पडलेली झाडे तातडीने हटवून नागरिकांना दिलासा

**अक्षराज : संदिप येवले**



**दि.०५, घाटकोपर (मुंबई) :** मुसळधार पावसामुळे गोळीबार रोड परिसरातील ए.पी. जे.अब्दुल कलाम स्कूल, घाटकोपर पश्चिम तसेच कातोडी पाडा येथील जय विजय मंडळ परिसरात रात्रीच्या वेळी झाडे पडल्याची घटना घडली.या घटनेची माहिती मिळताच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शाखा क्रमांक १२७ चे ईशान्य मुंबई विभागप्रमुख तथा माजी नगरसेवक सुरेश कृष्णा पाटील यांच्या प्रयत्नातून नगरसेविका व आरोग्य समिती सदस्या स्वरूपा सुरेश पाटील यांनी तातडीने महानगरपालिकेच्या गार्डन विभागाशी संपर्क साधला.गार्डन विभागाच्या अधिकारी पल्लवी यांच्या समन्वयाने कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून पडलेल्या झाडांची तातडीने कटिंग करून ती हटवली. त्यामुळे परिसरातील वाहतूक सुरळीत झाली आणि नागरिकांनाही मोठा दिलासा मिळाला.

# पुन्हा धुमारे फुटले...

## वृक्षतोडीवर निसर्गाचे शांत पण ठाम उत्तर

**अक्षराज : रघुनाथ थोरात**



**दि.०५, उंब्रज (सातारा) :** रस्त्याच्या रुंदीकरणासाठी, विकासकामांच्या नावाखाली किंवा इतर कारणांसाठी अनेक वृक्षांची निर्दयपणे तोड केली जाते. मात्र निसर्गाला हरवणे इतके सोपे नसते, हे या छायाचित्रातून पुन्हा एकदा स्पष्ट होते. पूर्णपणे छाटलेल्या या वृक्षाच्या बुंध्यातून पुन्हा नव्या पालव्या आणि धुमारे फुटले आहेत. जणू हा वृक्ष सांगत आहे – मला कितीही तोडा, जगण्याची माझी जिद्द संपणार नाही.हा देखावा केवळ एका झाडाचा नाही, तर निसर्गाच्या पुनर्जन्माचा संदेश आहे. माणूस एका क्षणात वृक्ष तोडू शकतो, पण त्याला पुन्हा मोठे होण्यासाठी अनेक वर्षे लागतात. तरीही कोणतीही तक्रार न करता हा वृक्ष पुन्हा नव्या उमेदीनं उभा राहत आहे. ही जिद्द प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. आज पर्यावरणाचा समतोल ढासळत असताना वृक्षांचे महत्त्व अधिक वाढले आहे. वाढते तापमान, कमी होत चाललेला पाऊस, प्रदूषण आणि जैवविविधतेचा ऱ्हास यामागे मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड हेही एक प्रमुख कारण आहे. त्यामुळे विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे. या छायाचित्रातील धुमारे केवळ नव्या फांद्या नाहीत; त्या आशेच्या, पुनर्निर्मितीच्या आणि जीवनशक्तीच्या हिरव्या खुणा आहेत. हा वृक्ष जणू प्रत्येकाला सांगतो आहे – माझ्या फांद्या छाटल्या, पण जगण्याची इच्छा छाटू शकला नाही.अशा प्रत्येक धुमाऱ्याचे जतन करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. कारण आज वाचवलेला प्रत्येक वृक्ष उद्याच्या पिढीसाठी शुद्ध हवा, सावली आणि जीवनाचा आधार ठरणार आहे. निसर्ग पुन्हा उभा राहत आहे; आता त्याला साथ देण्याची जबाबदारी आपली आहे.

## इंटरनॅशनल छायाचित्रण स्पर्धेतशिवराज भालेकरला गोल्डन मेडल



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०५, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील सुपा येथील लावण्या आर्टस क्लास मार्फत इंटरनॅशनल छाया चित्रण स्पर्धेत पारनेर तालुक्यातील अनेक विद्यार्थी-विद्यार्थीनी नी भाग घेतला होता. त्यामध्ये रांजणगाव येथील उद्योजक अरुण भालेकर यांचा चि. शिवराज भालेकर याने इंटरनॅशनल छायाचित्रण स्पर्धेत भाग घेऊनइंटरनॅशनल लेव्हलचे गोल्ड मेडल मिळवले. लावण्या आर्टस क्लासेसच्या संस्थापिका सायली कळसकर यांच्या हस्ते इंटरनॅशनल लेव्हलचे गोल्ड मेडल प्रदान करण्यात आले.कार्यक्रमासाठी सुपा पंचक्रोशीतील अनेक मान्यवर, विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## व्याज सवलत योजनेतून शेतकऱ्यांना ३२.६० कोटींचा लाभ

## १ लाख ४१ हजार ६४६ शेतकऱ्यांना दिलासा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** राज्य शासनाने नुकतीच ' पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेतकरी कर्जमुक्त योजना- २०२६ ' जाहीर केली आहे. यासोबतच डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचाही लाभ शेतकऱ्यांना देण्यात येत आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात चंद्रपूर जिल्ह्यातील १ लाख ४१ हजार ६४६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ३२ कोटी ६० लाख ८ हजार रुपये व्याजाची रक्कम थेट जमा करण्यात आली आहे. त्यामुळे ही योजना नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. शेतीसाठी पिक कर्ज घेऊन जे शेतकरी नियमितपणे कर्जाची परतफेड करतात, अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन लाभ देण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचा लाभ देण्यात येतो. पीक कर्जाची वसुली मुदतीपूर्वी होण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. शेतकऱ्यांनी घेतलेल्या अल्पमुदत पिक कर्जाची संपूर्ण परतफेड प्रतिवर्षी ३० जून पूर्वी केल्यास शेतकऱ्यांना शासनाकडून व्याज सवलत, अनुदान स्वरुपात देण्यात येते. राज्य शासनाने ३ लाखांपर्यंतच्या अल्पमुदत पीक कर्जासाठी वार्षिक ३ टक्के दराने व्याज सवलत सन २०२१-२२ पासूनच्या पीक कर्जास लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने डॉ. पंजाबराव देशमुख पीक कर्ज व्याज सवलत योजना ( सामान्य) (स्टेट पूल) अंतर्गत १ लक्ष १८ हजार ६२४ शेतकऱ्यांना २७ कोटी ७० लक्ष ८ हजार रुपयांचा लाभ, डॉ. पंजाबराव देशमुख पीक कर्ज व्याज सवलत योजना (सामान्य) (डीपीसी) अंतर्गत १८ हजार ४१७ शेतकऱ्यांना ४ कोटी, डॉ.पंजाबराव देशमुख पीक कर्ज व्याज सवलत योजना (विघयो) अंतर्गत २८५२ शेतकऱ्यांना ५० लक्ष, आदिवासी उपयोजना डॉ. पंजाबराव देशमुख पीक कर्ज व्याज सवलत योजना (टीएसपी) अंतर्गत ७७३ शेतकऱ्यांना २० लक्ष आणि आदिवासी उपयोजना डॉ.पंजाबराव देशमुख पीक कर्ज व्याज सवलत योजना (ओटीएसपी) अंतर्गत ९८० शेतकऱ्यांना २० लक्ष रुपये असे एकूण १ लक्ष ४१ हजार ६४६ शेतकऱ्यांना ३२ कोटी ६० लक्ष ८ हजार रुपयांचा लाभ देण्यात आला आहे.